क्र. जमीन-२६९०/प्रक्र. २३२२/ज-३.
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ६ एप्रिल १९९४.

विषय :- जमीन : मुंबई उपनगर जिल्हा.
मौ. गोराई, सर्व्हे नं. २६७ पै
व २७१ पै. महाराष्ट्र पर्यटन विकास
महामंडळ यांना पर्यटन विकास करण्या-
करिता जमीन मिळण्याबाबत-

ज्ञापन :-

जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांच्या क्रमांक कार्या.३/डी/जमी-९६६/डे-१३६ दिनांक १४-४-१९९३ च्या पत्रान्वये संपणाऱ्या पत्रव्यवहाराच्या संदर्भात विज्ञाप्तिपूर्वक कळविण्यात येते की, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांना मौजे गोराई येथील सर्व्हे नं. २७१ पै. मधील १९३ एकर ७ गुंठे आणि सर्व्हे नं. २६७ पै मधील ६९ एकर अशी एकूण २६२ एकर ७ गुंठे इतकी जमीन त्या जमिनीचा खाजगी उद्योजकांमार्फत विकास करुन घेण्याकरिता शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एलएनडी-१०९३/प्रक्र. ५५/ज-१, दिनांक ३-६-१९९३ मधील अटी व शर्तींवर देण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. हे ज्ञापन नगर विकास विभाग आणि वित्त विभागाच्या [अनौपचारिक संदर्भ क्र. १३५९/व्यय-९, दिनांक ७-१२-१९९३] सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[द. वि. फाटक]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति:-
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा.
बी. एम. आर. डी. ए. इमारत, वांद्रे [पूर्व], मुंबई-४०००५१.

प्रतिलिपी माहितीसाठी अग्रेषित:-

१. आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२. उप संचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, नवी मुंबई.
३. सहाय्यक संचालक, नगर रचना, मुंबई.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. महालेखाकार, मुंबई
६. वित्त विभाग [व्यय-९], मंत्रालय, मुंबई.
७. नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. निवड नस्ती ज-३ कार्यासन, महसूल व वन विभाग.

329/ W

6 2 ६ e

111-1

12/4/94

क्र. ६६/उडी/एल - ५५०
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय
बी.एम.आर.डी.ए. इमारत, ३रा मजला, वांद्रे [पूर्व ]
मुंबई ४०० ०५१.

दिनांक - २०-७-१९९५

वाचा- १. शासन महसूल व वन विभाग ज्ञापन क्र. जमीन २६१०/प्र.क्र.२३२ ब-३ दिनांक ४.४.९१

२. शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. एलएनडी १०९३/प्र.क्र. ५५/ज-१ दिनांक ३.६.९३

३. शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. एलएनडी १०९३/प्र.क्र. ५५/ज-१ दिनांक १७.२.९५

४. शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. जमीन १०८९/प्र.क्र. ... /ज-१ दिनांक १३.९.८९

५. शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. एलएनडी १०८९/प्र.क्र. ४४८ ज-१ दिनांक ७.१२.९०

<u>आदेश</u>

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांना मौजे गोराई तालुका बोरीवली येथील सर्वे नं. २७१ पैकी मधील १९३ एकर ७ गुंठे आणि सर्वे नं. २६७ पै मधील ६९ एकर अशी एकुण २६२ एकर ७ गुंठे इतकी जमीन या आदेशाच्या तारखे पासून प्रथमतः ३० वर्षासाठी वार्षिक नाममात्र रु.१/- या दराने भाडेपट्टयाने त्या जमिनीचा खाजगी उद्योजकांकडून पर्यटन विकास करण्यासाठी सोबत जोडलेल्या उद्देशिकेतील क्र. २ कडील शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.एलएनडी १०९३/प्र.क्र.५५/ज-१ दिनांक ३.६.९३ व उद्देशिकेतील क्र.३ कडील शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. एलएनडी १०९३/प्र.क्र.५५ /ज-१ दिनांक १७.२.९५ मधील अटी व शर्तीवर देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

महामंडळाला दिलेल्या जमिनीच्या भाडेपट्टयाचे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम ४० व महाराष्ट्र जमीन महसूल[सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे] नियम १९७१ मधील नियम २१ व ४१ मधील अटी व शर्तीना अधीन राहून पुढील ३० वर्षासाठी नुतनीकरण करता येईल.

Yashsayal
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

स्थळ प्रतीवर जिल्हाधिकारी
यांची सही असे.

प्रति,
महाव्यवस्थापक
महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, एक्सप्रेस टॉवर. १वा मजला,
नरिमन पॉईंट, मुंबई - ४०००२१

प्रत- नगर भूमापन अधिकारी क्र. ६ जोगेश्वरी[ यांजकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

त्यानी प्रश्नाधिन जमिनीचे सिमांकन करून जमिनीचा ताबा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास द्यावा. तसेच ताबा पावती व नकाशाच्या पाच-पाच प्रती या कार्यालयास सादर कराव्या.

प्रत- तहसिलदार बोरीवली यांजकडे माहिती व योग्य त्या ~~xxxxxx~~ कार्यवाहीसाठी रवाना.

स्थळ प्रतीवर जिल्हाधिकारी
यांची सही असे.

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा

५१९९५
वदेकर